SWADHAR

# स्वाधारवार्ता

जानेवारी २०१० वार्तापत्र

स्वाधार आय डी डब्ल्यु सी, पुणे

## पहिल्या वहिल्या **स्वाधारवार्ता** विषयी थोडेसे

आपण ह्या वार्तापत्रामध्ये ह्या महिन्यातील विशेष घडामोडी, कार्यक्रम, भेटींचे वृत्त व पुढील काही दिवसात योजलेले महत्त्वाचे कार्यक्रम नमूद करणार आहोत. शिवाय आपल्या लाभार्थी, कर्मचारींनी लिहिलेले लेख, बक्षीसपात्र निबंध वा कविता समाविष्ट करण्यास आवडेल म्हणून तुम्हाला खास विनंती:

लिहिते व्हा!

तुम्हाला हा अंक आवडेल ही आशा!

# विशेष घडामोडी:

### वाचनालय प्रकल्प – पुणे

**संक्रांतीनिमित्त**

§ सुमारे १०,००० लाभार्थींना

*तिळ–गूळ वाटप*

§ प्रकल्पातील २८ शाळांमधील सुमारे ५०० शिक्षिकांना सुमती गोरे ट्रस्ट येथे १५ ते २२ जानेवारी दरम्यान

*हळदी–कुंकू*

### विद्यार्थिनी शिक्षण साहाय्य

**दत्तक – पालक मेळावा**

§ १५ जानेवारी रोजी

निवारा येथे

दुपारी ३ ते ५:३०

§ प्रमुख पाहुण्या

श्रीमती वसुधा कुळकर्णी

ह्यांच्या मार्गदर्शनाखाली लाभार्थींची व्यक्तिमत्त्व विकासाशी ओळख

# नियोजित कार्यक्रम:

| वाचनालय प्रकल्प – पिंपरी–चिंचवड |
| --- |
| ३० जानेवारी रोजी सर्व पुस्तक पऱ्यांची<br>राळेगण सिद्धी व<br>पाबळ विज्ञान आश्रम<br>येथे **अभ्यास सहल** |

| इंद्रधनू कम्यनिटी सेंटर |
| --- |
| **वार्षिकोत्सव**<br>§ ३० जानेवारी रोजी<br>सकाळी १०:३० वाजता<br>§ प्रमुख पाहुणे<br>विप्रो केअर्सचे श्री प्रेमजी<br>§ सांस्कृतिक कार्यक्रम व विविध<br>खेळ–स्पर्धांसाठीचे<br>बक्षीसवाटप |

| वाचनालय प्रकल्प – पुणे |
| --- |
| जानेवारी – फेब्रुवारी दरम्यान<br>सर्व वर्गांमध्ये शिकवल्या जाणाऱ्या<br>**गाण्यांच्या व गोष्टींच्या स्पर्धा** |

## हैदराबाद सहलीचा अनुभव

हैदराबादची सहल खूप छान झाली. हैदराबादच्या सहलीला जाताना शारंगपणीमॅडम, अंजलीमॅडम, संयुक्तामॅडम व सहकारी यांचे परिश्रम जाणवत होते. इतक्या लोकांच्या याद्या, बुकींग, तिकीटे, हैदराबादमधील सोय खाणेपिणे तेथील फिरण्यासाठी वेगळ्या गाड्या तशीच तणावग्रस्त परिस्थितीत पर्यायी नियोजन यांची व्यवस्था खूपच चोख होती. हैदराबादला पाहण्यासारखे खूप आहे म्हणून आम्ही सर्वजण हवेतच होतो. बऱ्याच जणींचा रेल्वे प्रवास पहिल्यांदाच होता काहींना स्लीपर कोच मध्ये बसण्याचा आंनद अनुभवायला मिळाला.

हैदराबाद शहर व आसपासची प्रेक्षणीय स्थळे पहायला मिळाली. गोवळकोंडा किल्ला इतिहासात वाचला होता तो प्रत्यक्षात पाहिला. व तेथे गाईड घेतल्याने छान माहिती मिळाली व पुर्वीचे राजे महाराजे कसे राहायचे या उत्सुकतेचे निरसन झाले. तेथील अप्रतिम लेझर शो बदद्ल फक्त ऐक्ले होते तो पहायला मिळाला. गोवळकोंड्याचे टाळ्यांचे संकेत, भिंतीतल्या आवाजाची करामत आवडली.

रामोजी फिल्म सिटी खूप मोठी आहे व तेथे फिल्मस् शूटिंग होतात म्हणून ती पहायची फार उत्सुकता होती. ती पहाण्यास ३ दिवस सुध्दा अपुरे पडतात असे ऐक्ले होते ते पाहिले. रामोजी फिल्म सिटीमध्ये तिकिट काउंटरपासून बसमध्ये जाईपर्यंत काय पहायला मिळेल याचा अंदाज आला नव्हता. पण आतमध्ये गेल्यावर भव्यता पाहून चाट पडलो. ही सिटी फक्त ४ वर्षात निर्माण केली यावर विश्वास बसत नव्हता.

हवामहलमधे  सर्वांनी नाच केला. मराठी गाणे ऐकल्यावर सर्वजण खूष झाले. रामोजी सिटीमधील खेळात सर्वांनी खूप मजा केली.

भाषेची अडचण जाणवली नाही. हिंदीचा वापर सर्रास होत होता. चारमिनार, महाराष्ट्र मंडळ जवळ भरपूर खरेदी केली. गटपध्दतीने सर्वजण जबाबदारीने वागत होते. नाहीतर सर्वांना सांभाळणे कठीण झाले असते कारण प्रत्येकजण स्वतःच्या मनाप्रमाणे वागले असते. कोणालाही एकमेकांना वागण्याबोलण्याबाबत बोलता आले नसते.

स्वाधार सस्ंथेने आमच्या एकूण परिस्थितीचा विचार करून आमच्यासाठी ५ दिवसांच्या सहलीचे आयोजन केल्याबद्दल संस्थेचे मनःपूर्वक आभार!